# टिपणी

# पुणे शहरातील उच्च क्षमता वाहतूक मार्ग (एच.सी.एम.टी.आर.)

पुणे शहराचे सन १९८७ मान्य विकास योजना आराखडयामध्ये एच.सी.एम.टी.आर.रस्ता दर्शविला असून सदरचा रस्ता विकसित करणेकरीता सदर रस्त्याचा सर्व्हे करून तात्काळ जागा ताब्यात घेणेबाबतची कायवाही पुणे म.न.पा.तर्फे चालू आहे. सदर एच.सी.एम.टी.आर. रस्त्याचे सर्व्हेक्षणाचे काम मनपातर्फे मे. मोनार्क सर्व्हेअर्स आणि इंजिनिअरिंग कन्सलटंन्स प्रा.लि. यांनी पुर्ण केलेले आहे.

एच.सी.एम.टी.आर. रस्याबाबतचा तपशील खालीलपमाणे

| | | |
|---|---|---|
| रस्त्याची एकूण लांबी | = | ३३.८० कि.मी. |
| रस्त्यासाठी लागणारे एकूण क्षेत्र | = | ६८.०३ हेक्टर |
| पुणे म.न.पा.च्या ताब्यातील क्षेत्र | = | लांबी ८.१४ कि.मी. (२४%)<br>क्षेत्र १४.०७ हेक्टर (२१%) |
| पुणे म.न.पा.च्या ताब्यात न आलेल्या खाजगी मिळकती | = | लांबी ११.१५ कि.मी. (३२%)<br>क्षेत्र २५.४९ हेक्टर (३७%) |
| पुणे म.न.पा.च्या ताब्यात न आलेल्या सरकारी मिळकती (वन विभाग, जलसंपदा विभाग, संरक्षण विभाग, सा.बां.विभाग, येरवडा जेल, पुणे विद्यापीठ, एस.आर.पी.एफ. इत्यादी) | = | लांबी १४.५१ कि.मी. (४३%)<br>क्षेत्र २८.४७ हेक्टर (४२%) |

• सदर रस्त्याच्या भूसंपादनासाठी लागणारी अंदाजे रक्कम= १५५० कोटी (२०१५ च्या शिघ्रसिद्द गणकाप्रमाणे)

• सदर रस्त्याच्या भूसंपादन प्रकरणी कलम १९ ची अधिसूचना प्रसिध्द होण्यासाठी एकूण नुकसान भरपाई रकमेच्या ५०% रक्कम म्हणजेच ७७५ कोटी शासनाकडे भरावे लागणार आहेत. तथापी त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून मागणी प्राप्त झालेली नाही.

• पुणे म.न.पा.च्या विकास योजना आराखडयाप्रमाणे एच.सी.एम.टी.आर. (उच्च क्षमता वाहतूक मार्ग) बोपोडी, औंध, भांबुर्डा, एरंडवणा, कोथरूड, हिंगणे बुद्रूक, सदशिव पेठ, पर्वती, मुंजेरी (बिबवेवाडी), वानवडी, हडपसर, मुंढवा, वडगाव शेरी, लोहगाव, येरवडा, धानोरी व कळस या भागातून जात आहे. या भागांपैकी बोपोडी, भांबुर्डा, एरंडवणा, कोथरूड, हिंगणे बुद्रूक, सदाशिव पेठ, पर्वती, हडपसर, मुंढवा या ९ भागांची संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे.

• नविन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वयेचे कलम १९ ची अधिसूचनेची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१६, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे स्तरावर सुरू आहे.

**शासकीय जमिनी हस्तांतरण सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.**

१) **पाटबंधारे विभाग**- हडपसर मगरपट्टा सिटी मागील कॅनॉल ते सोलापूर हायवे (MISSING LINK) येथील पाटबंधारे (जलसंपदा विभाग) विभागाची कॅनॉलगतची जागा एच.सी.एम.टी.आर. टप्पा १ अंतर्गत पुणे

मनपास आगाऊ ताबा व नाहरकत पत्र देऊन रस्ता विकसित करणेसाठी पुणे मनपास सहकार्य करणेसाठी मा.अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ व मा.जिल्हाधिकारी महसूल शाखा यांना इकडील जा.क्र.अनुक्रमे अतिमआई /माव्य / ६२० दि.२९.०४.२०१५ व अतिमआई /माव्य / ४९४ दि.२३.०४.२०१५अन्वये पत्र देणेत आलेले आहे. तथापी सदर भागातून जाणाऱ्या प्रस्तावित रस्त्याचा संपूर्ण सर्व्हेक्षण अहवाल (DPR),रस्त्याचे एल सेक्शन नकाशे इत्यादी बाबींची माहिती पाटबंधारे विभागाने अपेक्षलेली आहे. याबाबत मा.मुख्य अभियंता (पथ ) यांचेकडून जा.क्र.मा.व्य./१२२ दि.०८.०४.२०१५ च्या पत्राने मागविलेली आहे. पथ विभागाकडुन याबाबतची कार्यवाही चालु आहे.
यापूर्वी डायस प्लॉट ते सातारा रस्ता कॅनॉल लगतचे ऑफिस व वसाहती पुनर्वसनासाठी सिंहगड रस्त्यावरील पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या ॲमेनिटी स्पेस च्या काही जागा पाटबंधारे विभागाकडील प्रतिनिधींना दाखवलेल्या असून त्यांनी स्वारगेट येथील जागा निवडलेली आहे तथापी सदर जागेवर पाणीपुरवठा विभागाचे आरक्षण प्रस्तावित आहे त्यामुळे सादर जागा त्यांना देता येणार नाही.याव्यतिरिक्त इतर जागा लांब असल्याने त्या जागा पाटबंधारे विभागास सोयीच्या नसल्याने त्यांनी त्या नाकारल्या आहेत.

२) **संरक्षण विभाग**- संरक्षण खात्याच्या हद्दीतील बोपोडी ,मुंजेरी,वानवडी, वडगावशेरी व लोहगाव या भागातील एच.सी.एम.टी.आर. रस्त्याने बाधित जागा पुणे महानगरपालिकेला देण्यास संरक्षण विभागाने नकार दिलेला असल्याने पुणे मनपा तर्फे रीअलाईनमेंट बाबत नियोजन समीतीकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. रीअलाईनमेंट प्रमाणे पुन्हा दुरुस्त नकाशे तयार करून संरक्षण विभागाकडे अंदाजे १.०१ हेक्टर क्षेत्र हस्तांतरित करणेचा प्रस्ताव दि २७.०८.२०१५ रोजी सादर करणेत आलेला होता तथापी शासन गठीत नियोजन समीतीने रीअलाईनमेंट चा प्रस्ताव फेटाळला आहे. तसेच रीअलाईनमेंट प्रमाणे पुन्हा दुरुस्त नकाशे तयार करून संरक्षण विभागाकडे अंदाजे १.०१ हेक्टर क्षेत्र हस्तांतरित करणेचा प्रस्ताव संरक्षण विभागाने त्याचे दि.०५.१०.२०१५ च्या पत्राने फेटाळला आहे.

३) **वन विभाग** - वनविभागाच्या ताब्यातील जागा पुणे मनपास हस्तांतरीत करणेकामी पुणे मनपातर्फे ऑन लाईन प्रस्ताव FP/MH/ROAD/9500/2015 दि. २३.०१.२०१५ रोजी दाखल केलेला असून सदर प्रस्तावावर वन विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

४) **औंध सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ** - औंध सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाने एच.सी.एम.टी.आर. रस्त्याने बाधित जागा देणेस नकार दिलेला असून सदर ठिकाणी जवळच पुणे मनपातर्फे ३०.० मी डीपी रस्त्याचे काम चालू असून सदर रस्त्यावर एच.सी.एम.टी.आर रस्ता ओव्हरलॅप करणेची विनंती सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाने केलेली असून त्यानुसार एच.सी.एम.टी.आर रस्त्याच्या रीअलाईनमेंट बाबत नियोजन समीतीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असता शासन गठीत नियोजन समीतीने रीअलाईनमेंट चा प्रस्ताव फेटाळला आहे..

५) **येरवडा कारागृह** - येरवडा कारागृहाच्या मालकीची जागा हस्तांतरण करणेस कारागृह विभागाने सुरेक्षतेच्या दृष्टीकोनातून नकार दिला आहे. तथापी सदर जागेची मागणी मा.अवर मुख्य सचिव (गृह) व मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे कडे केलेली असून त्यांचेकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. सदर हस्तांतरण प्रक्रियेस विलंब होणार असल्याने पुणे मनपा तर्फे सदर जागेतून जाणा-या एच.सी.एम.टी.आर.रस्त्याच्या रीअलाईनमेंट बाबत नियोजन समीतीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असता शासन गठीत नियोजन समीतीने रीअलाईनमेंट चा प्रस्ताव फेटाळला आहे.

६) **एसआरपीएफ** - राज्य राखीव दलाच्या (एसआरपीएफ) मालकीची जागा हस्तांतरण करणेस राज्य राखीव दलाने सुरेक्षतेच्या दृष्टीकोनातून नकार दिला आहे. त्यामुळे सदर जागेतून जाणा-या एच.सी.एम.टी.आर.रस्त्याच्या रीअलाईनमेंट बाबत नियोजन समीतीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असता शासन गठीत नियोजन समीतीने रीअलाईनमेंट चा प्रस्ताव फेटाळला आहे.

**उर्वरित भागांची भूसंपादनाची कार्यवाहीची सद्य:स्थिती खालील प्रमाणे ..**

- मुंजेरी (बिबवेवाडी) ची संयुक्त मोजणी जागेवरील इंडिया बायबल ॲंड ट्रेनिंग इंन्स्टिटयूट यांचेकडून विरोध झाल्याने अंशत: पूर्ण झाली आहे.
- कळस व धानोरी येथील रस्ता जागेवर विकसित झालेला आहे.
- लोहगांव, वडगांव शेरी व वानवडी येथील भूसंपादनाचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेत आलेले आहे. यावर जिल्हाधिकारी, पुणे यांनी शासनाचे दि. १२/०५/२०१५ चे निर्णयानुसार खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी करणे अथवा एफ.एस.आय अगर टी.डी.आर च्या बदल्यात जागा मिळविण्याबाबत दि. १९/१२/२०१५ चे पत्रान्व्ये कळविलेले आहे. यावर दि. २७/०१/२०१६ अन्वये पुणे महानगरपालिकेमार्फत जमिन खाजगी वाटाघाटीने खरेदी करण्याकरिता शासनाचे दि. १२/०५/२०१५ चे आदेशाचा निर्णय पुणे महानगरपालिका हद्दीतील विविध विकास योजनेसाठी लागू राहील काय इत्यादीबाबत विचारणा करण्यात आलेली आहे.
- नविन कायदा सन २०१३ चे कलम १९ च्या अधिसुचना काढण्यापुर्वी करावयाच्या कार्यवाहीसाठी विशेष भूसंपादन अधिकारी क्र.१६ यांचे जिल्हाधिकारी, पुणे यांचे दि. ०८/१२/२०१५ चे पत्रानुसार कलम १६ ते १८ मधील तरतुदीनुसार पुर्नवर्सन व पुर्नस्थापनेची प्रारुप विकास योजना तयार करुन मा. जिल्हाधिकारी , पुणे यांचे कडे सादर करण्याविषयीची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
- भूमीसंपादन व पुर्नस्थापन व पुनर्वसन करताना वाजवी भरपाई मिळण्याच्या पारदर्शक हक्क अधिनियम २०१३ नुसारविकास योजना बाहय परस्तावांसाठी "**सामाजिक परिणाम निर्धारण** "(Social impact Assessment Report) अहवालाच्या अमंलबजावणीसाठीची एजन्सीची नेमणूक करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी,पुणे यांचे स्तरावर सुरु आहे.
- एच.सी.एम.टी.आर रस्त्यासाठी एकुण ६८.०३ हेक्टर क्षेत्राची आवश्यकता आहे. सदर क्षेत्रापैकी १४.०७ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असुन त्यावर रस्ता विकसीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत क्षेत्रापैकी सरकारी वनविभाग, जलसंपदा विभाग, पुणे विद्यापीठ, रेल्वे संरक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, येरवडा कारागृह २८.४७ हेक्टर क्षेत्राचे प्रस्ताव संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेले असुन सदर क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी पुणे मनपाचे मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडुन पाठपुरावा सुरु आहे. उर्वरीत २५.४९ हे. इतके क्षेत्र खाजगी असुन या सर्व क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कडे सादर केलेल असुन त्याचे कार्यालयामार्फत सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

- एच.सी.एम.टी.आर. टप्पा एक अंतर्गत मुंढवा, ताडीगुत्ता चौक ते सोलापूर हायवे पर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन असून सदर रस्ता भारत फोर्ज कंपनीमागे दोन मिळकतदार यांनी जागा पुणे म.न.पा.स हस्तांतरीत न केल्याने प्रलंबित आहे. सदर मिळकतदारांसोबत चर्चा झालेली असून मिळकतदार रस्त्याने बाधीत जागेचे हस्तांतरण करणेस तयार नसल्याने सदर जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेणेबाबत पुणे म.न.पा.कडील भूसंपादन व व्यवस्थापन विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.
- दि.१८ मे, २०१५ रोजी मा. पालकमंत्री, पुणे यांनी नविन शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत सदर प्रकल्पावर चर्चा होवून सदरचा प्रकल्प पी.एम.आर.डी.ए. मार्फत राबविणे संयुक्तिक होवू शकेल अशी चर्चा झाली. या प्रकल्पात बाधीत होणा-या शासकीय जागांचे भूसंपादन करणेकामी आवश्यक ती कार्यवाही करावी अशा पुणे महानगरपालिकेस सूचना दिल्या.
- सदर उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एच.सी.एम.टी.आर.) प्रकल्प पुणे महानगरपालिका पूर्ण क्षमतेने राबविणार आहे किंवा कसे याबाबत पुणे महानगरपालिकेचे सर्वकष मत पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणास कळविणेबाबत जा.क्र. पी.एम.आर.डी.ए./आस्थापना/७५९ दि.४/६/२०१५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विचारणा केली आहे.

त्यानुसार पुणे महानगरपालिकेकडून मा.मुख्य कार्यकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांना जा.क्र.पथ/३८१८ दि.१६/९/२०१५ अन्वये प्रकल्पाची सविस्तर महिती सादर केलेली आहे. त्यांचेकडून अद्याप अभिप्राय प्राप्त झालेला नाही.